रेमंड, ओ.सी.एम., दिनेश, सॅन्टोजिन,
दिग्जाम डिलक्स भिलवारा, ग्वालियर,
रेमोलिन इत्यादी मिल्सचे सुटींग्ज

शां. कृ. पंत वालावलकर
कापड दुकान ट्रस्ट

लक्ष्मी रोड, कोल्हापूर, फोन नं. २६४४३६३

स्वतंत्र मतवादी दैनिक

# नवसंदेश

संस्थापक कै. गणपतराव बळवंतराव भोसले

प्रिया सुईंग मशिन
कंपनी

विक्री व दुरुस्ती, स्पेअर पार्ट

मोबाईल - ९८५०११६७२०,९३७०११४६७३

५१६ डी वॉर्ड, गंगावेस रोड,
कोल्हापूर-४१६००२

कोल्हापूर फोन नं. २६४२८८० (वर्ष ५८) अंक ४३ वा पाने ४ (किंमत २ रूपये) शुक्रवार ता.२१ फेब्रुवारी २०२५ KLR- 006/2025-27 Posted at Kolhapur RMS RNI No. MAHMAR/1960/14107

## लोकपालच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाची थगिती

दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने आज एक मोठा निर्णय घेत लोकपालच्या आदेशाला स्थगिती दिली आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरुद्धच्या तक्रारींची चौकशी करणे लोकपालाच्या अधिकारक्षेत्रात येते, असे म्हणणाऱ्या लोकपालाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

लोकपालच्या आदेशाची स्वतःहून दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र, लोकपालचे रजिस्ट्रार आणि लोकपालसमोर तक्रारदाराला नोटीस बजावली आहे. न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यासाठी हे प्रकरण खूप महत्त्वाचे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

माहितीनुसार, न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती अभय एस ओका यांच्या खंडपीठाने लोकपालच्या युक्तिवादाशी असहमती दर्शवली आणि आदेशाला स्थगिती दिली. न्यायालयाने लोकपालचे रजिस्ट्रार जनरल आणि तक्रारदार यांनाही नोटीस बजावली. खंडपीठाने तक्रारदाराला उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे नाव आणि तक्रारीतील मजकूर उघड करण्यास मनाई केली.

लोकपालच्या युक्तिवादावर भाष्य करताना न्यायमूर्ती गवई म्हणाले की, हे खूपच त्रासदायक आहे. भारताचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, लोकपालाचा अर्थ चुकीचा आहे आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना लोकपालाखाली आणण्याचा कधीही हेतू नव्हता.

न्यायमूर्ती गवई आणि न्यायमूर्ती ओका म्हणाले की, संविधान लागू झाल्यानंतर, सर्व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश हे संवैधानिक अधिकारी आहेत आणि लोकपालाच्या मते त्यांना केवळ वैधानिक अधिकारी म्हणून वागवले जाऊ शकत नाही. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनीही लोकपालच्या निर्णयावर टीका केली आणि त्यावर स्थगिती देण्याची विनंती खंडपीठाला केली.

२७ जानेवारी रोजी दिलेल्या आदेशात, लोकपाल एका तक्रारीवर निर्णय घेत होते ज्यामध्ये उच्च न्यायालयाच्या एका सेवारत न्यायाधीशाने एका अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश आणि दुसऱ्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना एका खाजगी कंपनीच्या बाजूने प्रभावित केल्याचा आरोप करण्यात आला होता.

लोकपाल (सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती ए.एम. खानविलकर यांच्या अध्यक्षतेखाली) यांनी असा निर्णय दिला की उच्च न्यायालयाचा न्यायाधीश लोकपाल कायद्याच्या कलम १४(१)(एफ) च्या कक्षेत संसदेच्या कायद्याद्वारे स्थापन केलेली संस्था म्हणून पात्र असेल. असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रश्नातील उच्च न्यायालय हे नव्याने स्थापन झालेल्या राज्यासाठी संसदेच्या कायद्याद्वारे निर्माण केले गेले असल्याने, ते कलम १४(१)(४) अंतर्गत येईल.

२०१३ च्या कायद्याच्या कलम १४(१) च्या कलम (फ) मधील कोणतीही व्यक्ती या अभिव्यक्तीच्या कक्षेत उच्च न्यायालयाचा न्यायाधीश येणार नाही असा युक्तिवाद करणे मूर्खपणाचे ठरेल, असे लोकपाल म्हणाले. खटल्याच्या गुणवत्तेवर कोणतेही मत व्यक्त न करता, लोकपालने तक्रार मुख्य न्यायाधीशांकडे पाठवली, त्यांच्या मार्गदर्शनाची वाट पाहत, असे आदेशात म्हटले आहे. आम्ही हे (पान ४ वर)

## 'शक्तिपीठ' महामार्गाविरोधात एल्गार!

### १२ मार्चला १२ जिल्ह्यातील शेतकरी आझाद मैदानवर धडकणार

कोल्हापूर : शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा शक्तिपीठ महामार्ग कुठल्याही परिस्थितीत हाणून पाडणार, तसेच शक्तिपीठ महामार्गाविरोधात १२ मार्चला १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा आझाद मैदानावर मोर्चा काढण्याचा निर्धार कोल्हापुरात शक्तिपीठ महामार्ग कृति समितीच्या बैठकीत घेण्यात आला. शाहू स्मारक भवन येथे शक्तिपीठ महामार्गविरोधी कृति समितीच्या वतीने बारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही बैठक आमदार सतेज पाटील यांच्या प्रमुख




उपस्थितीत पार पडली.

दरम्यान, कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विरोधामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर स्थगित करण्यात आलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या कामाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दाखवल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत.

या महामार्गाला फक्त कोल्हापुरातून विरोध असे सांगितले गेले. कोल्हापूर जिल्ह्यातील महायुतीच्या नेत्यांमध्येच शक्तिपीठ महामार्गावरून फाटे पडले आहेत. उपमुख्यमंत्री आणि तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापुर जिल्ह्यात बोलताना शक्तीपीठ महामार्ग नको असेल तर तो रद्द करण्याची मी घोषणा करतो, नको असणारा प्रकल्प तुमच्यावर लादणार नाही, असे विधान केले होते. आता त्यांच्याच पक्षाचे राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी महामार्गाचे समर्थन केलं आहे.

यावेळी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी आमची इंचभरही जमीन देणार नाही, वाडवडिलांकडून वारसा हक्काने आलेली जमीन सोडणार नाही, पिकाऊ शेतजमीन ही आमची भूमी आई आहे, अशी शपथ घेतली. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात सूतोवाच केले होते. महामार्गासाठी जमीन संपादनाचे काम सुरू केले आहे; मात्र हा विकासाचा मार्ग नसून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा मार्ग आहे. हा मार्ग अंबानी, अदानी यांचा विकास करणारा मार्ग (पान ४ वर)

## दमानियांकडील कागदपत्रांच्या सत्यतेच्या चौकशीची मागणी

मुंबई : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी अंजली दमानिया यांना मिळालेल्या गुप्त कागदपत्रांच्या सत्यतेबाबत पोलिस चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. त्यांनी सांगितले की, सनसनाटी आरोप करण्याचा अधिकार लोकशाहीत आहे, मात्र जबाबदार मंत्र्यांवर खोटी कागदपत्रे तयार करून २०० कोटींच्या व्यवहाराला मान्यता दिल्याचा आरोप चुकीचा आहे.

दरम्यान, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी १९९५ मधील फेरफार प्रकरणात आलेल्या निकालाविरोधात गुरुवारीच मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल करणार असल्याचे स्पष्ट केले. राष्ट्रवादी (पान ४ वर)

## परदेशातून एमबीबीएस करण्यासाठीही नीट उत्तीर्ण करणे अनिवार्य

दिल्ली : परदेशातून एमबीबीएस करण्यासाठी नीट यूजी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाचा हा नियम सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. केंद्र सरकारने २०१८ मध्ये लागू केलेल्या या नियमामुळे परदेशात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना भारतात वैद्यकीय प्रॅक्टिस करण्यासाठी आवश्यक मानकांची पूर्तता करता येईल.

हे नियम निष्पक्ष, पारदर्शक असून कोणत्याही वैधानिक तरतुदी किंवा राज्यघटनेच्या विरोधात नाहीत, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला. हा नियम इंडियन मेडिकल कौन्सिल अॅक्ट १९५६ मधील कोणत्याही तरतुदीच्या विरोधात नाही किंवा कोणत्याही प्रकारे मनमानी किंवा अवाजवी नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

नीट यूजी उत्तीर्ण होणे हे पदवीधर वैद्यकीय शिक्षण नियम, १९९७ मध्ये निर्धारित पात्रतेच्या निकषांची पूर्तता करण्याव्यतिरिक्त (पान ४ वर)

## भाजप - शिंदे गटात धुसफूस; खरपुडी प्रकल्पाच्या चौकशीचे आदेश

मुंबई : महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये शीतयुद्ध सुरु असल्याची चर्चा दर दोन दिवसांआड होताना दिसत आहे. पालकमंत्रीपदावरुन शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांच्यातील वाद अद्याप मिटलेला नाही.

त्यातच आता एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मंजुरी दिलेल्या जालना जिल्ह्यातील खरपुडी प्रकल्पाच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या चौकशीची माहिती नसल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

जालना जिल्ह्यातील खरपुडी प्रकल्पाला देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अव्यवहार्य प्रकल्प असल्याचा अहवाल आल्यानंतर स्थगिती देण्यात आली होती. मात्र एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी या प्रकल्पाला मंजुरी दिली होती. याची माहिती विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिली होती. त्यांनी सविस्तर पत्र लिहून फडणवीसांना या प्रकल्पाला केव्हा मंजुरी, आणि केव्हा रद्द केले गेले याची माहिती दिली आहे.

मुख्यमंत्री सचिवालयाने खरपुडी प्रकल्पाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. यावर एकनाथ शिंदे म्हणाले की, आम्ही सुरु केलेले प्रकल्प हे लोकहितासाठी प्रकल्प आहेत. मी सुरु केलेल्या प्रकल्पाला तत्कालिन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मान्यता दिली होती. आता त्या प्रकल्पांची चौकशी सुरु करण्यात आल्याची कोणतीही माहिती नाही. मी माहिती घेऊन त्यावर बोलणार, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. (पान ४ वर)

## पंतप्रधानांच्या पदवीचा वाद आता न्यायालयात

### एखाद्याला पदवी देणं ही वैयक्तिक बाब कशी?

दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पदवीची माहिती उघड केली असल्याचे प्रकरण हे आता न्यायालयापर्यंत जाऊन पोहचले आहे. या संदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याविरोधात एक याचिका दाखल करण्यात आली आहे. याच याचिकेवर सुनावणी काल पार पडली. यावेळी याचिकाकर्त्यांनी एखाद्या व्यक्तीला पदवी देणे ही काही वैयक्तिक बाब नसून ती सार्वजनिक गोष्ट असल्याची म्हटले आहे. तसलेच पंतप्रधानांनी ही माहिती उघड न केल्याने यावर आक्षेप घेण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दिल्ली विद्यापीठातून १९७८ साली उत्तीर्ण झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, त्यांच्या पदवीची माहिती मिळावी, अशी मागणी करणारा अर्ज इरशाद नामक माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी केला होता. यामध्ये १९७८ साली उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती व गुणपत्रिका मिळावी, अशी विनंती करण्यात आली आहे. केंद्रीय माहिती आयोगाने २१ डिसेंबर २०१६ रोजी ही माहिती अर्जदाराला मिळावी असे निर्देश दिले. मात्र, दिल्ली विद्यापीठाच्या मागणीनंतर उच्च न्यायालयाने २३ डिसेंबर २०१७ रोजी केंद्रीय माहिती आयोगाच्या आदेशाला स्थगिती दिली.

आता हे प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी आले असून त्यासंदर्भात याचिकाकर्त्यांकडून वकील शादान फरासत यांनी युक्तिवाद केला. दिल्ली विद्यापीठ ही एक सार्वजनिक संस्था आहे. त्यामुळे ती माहिती अधिकाराच्या कक्षेत येते. एखाद्याची पदवी ही त्याला मिळणारी सवलत असून त्याचा तो अधिकार नाही. मला शासनानं काही आवश्यक निकषांच्या पूर्ततेसाठी ती पदवी दिलेली असते. त्यामुळे पदवी देणं ही एक सार्वजनिक कृती आहे. संबंधित व्यक्तीची शैक्षणिक पात्रता दर्शवण्यासाठी ती दिली जाते. त्यात वैयक्तिक वा खासगी असं काहीही नाही. मला स्वतःसाठी पदवी नको असते, ती एक सार्वजनिक कृती आहे, असं फरासत न्यायालयात म्हणाले.

ही एक माहिती आहे. दिल्ली विद्यापीठानं ती तयार केली आहे. दिल्ली विद्यापीठानं पदवी दिली आहे, संबंधित व्यक्तीनं दिल्ली विद्यापीठाला पदवी दिलेली नाही. शिवाय या प्रकरणात अमुक व्यक्तीलाच ही माहिती का हवी आहे? हा प्रश्नही गैरलागू आहे. जे काही सार्वजनिक आहे, त्या प्रत्येक बाबीसंदर्भात प्रत्येकाला माहिती घेण्याचा अधिकार आहे, असंही फरासत यांनी आपल्या युक्तिवादात नमूद केलं.

केंद्रीय माहिती आयोगाने दिल्ली विद्यापीठाला १९७८ साली बीएची (पान ४ वर)

## अजित पवारच धनंजय मुंडेंना वाचवतात - करूणा शर्मा

बीड : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार गट) मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोपांचे सत्र सुरूच आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आधीच मुंडेंवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, त्यातच आता करूणा शर्मा यांनीही मोठे आरोप करत त्यांच्यावर टीका केली आहे.

त्या म्हणाल्या, 'मस्साजोग प्रकरणात सुप्रिया सुळे जसे लक्ष देत आहेत, तसेच माझ्याबाबतही न्याय द्यावा. कलेक्टर कार्यालयात वाल्मिक कराड यांनी मंत्री धनंजय मुंडेंसमोर माझ्यावर हल्ला केला. त्या घटनेची सीसीटीव्ही फूटेज उपलब्ध करून द्यावी,' अशी मागणी त्यांनी केली. तसेच, 'मुंडेंनी अनेक लोकांच्या जमिनी कब्जा केल्या आहेत, त्या सोडवण्यासाठी सरकारने मदत करावी,' असेही त्यांनी सांगितले. (पान ४ वर)

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना जीवे मारण्याची धमकी देणारा ताब्यात

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची ई मेल द्वारे धमकी देणाऱ्या एका संशयिताला मुंबई गुन्हे शाखेने बुलढाणा येथून ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. शिंदे यांना जीवे मारण्याच्या धमकीचे ई मेल मुंबईतील अनेक पोलीस ठाणे आणि मंत्रालयात पाठविण्यात आले होते. या प्रकरणी गोरेगाव पोलिसांनी गुरुवारी सायंकाळी उशिरा गुन्हा दाखल केला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या गाडीला बॉम्बने उडवण्याची देणारे धमकीचा ई-मेल गुरुवारी सकाळी एकाच वेळी मुंबईतील गोरेगाव, जेजे मार्ग, एमआरए मार्गसह काही पोलीस ठाणी आणि मंत्रालयात आला होता. धमकीचा ईमेल करणारा हा निनावी नावाने आला होता. ईमेलद्वारे आलेल्या धमकीने संपूर्ण राज्यात खळबळ उडवुन दिली होती. या धमकीचा ई मेलनंतर मुंबई पोलिसांची संपूर्ण यंत्रणा कामाला लागली होती, गुन्हे शाखेने तसेच सायबर सेलने या ई मेलचा 'आय पी अड्रेस' चा शोध सुरू केला होता.

दरम्यान मुंबईत अनेक ठिकाणी आलेल्या या धमकीच्या ईमेल प्रकरणी कुठे गुन्हा दाखल करायचा म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्यात चर्चा सुरू होती. अखेर गुरुवारी सायंकाळी उशिरा गोरेगाव पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३५१(३),(४),३५३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दरम्यान मुंबई गुन्हे शाखेने ज्या आयपी अड्रेस वरून धमकीचा ई मेल पाठविण्यात आला त्याचा पत्ता शोधून काढला असता हा पत्ता बुलढाणा येथील (पान ४ वर)

## ब्लॅकमेलिंगचा आरोप करत अभिजीत पवार यांची घरवापसी

मुंबई : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे स्वीय सहायक अभिजित पवार आणि हेमंत वाणी यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला होता.

मात्र आता त्यांनी आता पुन्हा एकदा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत घरवापसी केली आहे. यावेळी त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करण्यासाठी आपल्यावर दबाव होता. परंतु आता आपण ब्लॅकमेलिंगला बळी पडणार नाही, असा आरोप त्यांनी यावेळी केला.

अभिजीत पवार म्हणाले की, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करण्यासाठी माझ्यावर दबाव होता. केवळ जितेंद्र आव्हाड यांना अडकविण्यासाठीच माझा वापर केला जाणार होता. जर जितेंद्र आव्हाड यांचा मला फोन आला नसता तर मी आत्महत्या केली असती. पण आज मी घरवापसी केली असून मरेपर्यंत जितेंद्र आव्हाड हेच माझे नेते असतील. खरं तर माझ्यावर गुन्हा दाखल करून मला पुन्हा दोन वर्षे जेलमध्ये पाठविण्याचे प्लॅनिंग होते. माझ्या मित्रांना देखील पोलिसांकडून धमक्या दिल्या जात होत्या. ईडीची धमकी दिली जात होती. त्यामुळे मी अस्वस्थ झालो होतो. नजीब मुल्ला मला फोन लावून इतरांकरवी धमक्या देण्याचे काम करत होते. त्यांनी पक्षप्रवेशासाठी मला ब्लॅकमेलिंग केले होते. पण त्यांच्या ब्लॅकमेलिंगला मी आता बळी पडणार नाही. माझी एवढीच चूक झाली की मी जितेंद्र आव्हाडांसोबत बोलायला हवे होते. पण मी तणावात होतो, त्यामुळे हा सर्व प्रकार घडला, असे अभिजित पवार यांनी म्हटले.

अजित पवार म्हणाले होते की, अभिजीत पवारबाबत मला बरीच माहिती होती. ते कुणासोबत काम करत होते, हे देखील मला माहिती आहे. ते आमचेच नातलग आहेत. पण आता पवारच यायला उशीर करायला लागले, तर मग बाकी कधी आपल्याकडे येतील, अशी मिश्किल टिप्पणी त्यांनी केली. तसेच ते पुढे म्हणाले की, अभिजित पवार आपल्याकडे येत असल्याचे समजताच अनेकांचे फोन सुरू होते. अभिजीत कुठे जाऊ नकोस. आपण बसून बोलुयात, चर्चा करूयात आणि मार्ग काढूयात. पण कधी मार्ग काढणार होते? एवढे दिवस काय गोट्या खेळत होते का? असे म्हणत अजित पवार यांनी टीका केली होती.

## रायगडमध्ये भूकंपाचे धक्के

रायगड : पेण तालुक्यातील हेटवणे धरणापासून काही अंतरावर असणाऱ्या तिलोर आणि महागाव परिसरात काल रात्रीपासून भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. बुधवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास पहिला धक्का जाणवला. त्यानंतरही काही सौम्य धक्के जाणवल्याचं स्थानिकांनी माहिती दिली.

भूकंपाचे धक्के जाणवले तेव्हा अनेक घरातील भांडी जमिनीवर पडली. तसेच भिंतीवर लटकलेल्या अनेक वस्तू पडल्याचं प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं. सुदैवानं भूकंपात कोणतीही जीवितहानी आणि वित्तहानी झालेली नाही. भूकंपानंतर जिल्हा (पान ४ वर)

## दादरमध्ये १० कोटींच्या एमडी ड्रग्ज सह दोघांना अटक

मुंबई : मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी दया नायक यांच्या पथकाकडून दादरच्या एका गेस्ट हाऊसमध्ये छापा टाकून १०.०८ कोटी रुपये किंमत असलेला एमडी या अमली पदार्थासह दोघांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेले दोघे गोवंडी शिवाजी नगर परिसरात राहणारे आहेत. मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष ९ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक यांच्या पथकाला मिळालेल्या माहिती वरून ही कारवाई करण्यात आली आहे.

गुन्हे शाखा कक्ष ९ च्या पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे दया नायक आणि त्यांच्या पथकाने बोगस ग्राहक तयार करून या ड्रग्ज विक्रेत्याकडे एमडी या अमली पदार्थाची मागणी करण्यात आली. हे अमली पदार्थ दादर येथील एका हॉटेलमध्ये मागविण्यात आले होते. गुन्हे शाखेने दादर पूर्व येथील समर लॅंड गेस्ट हाऊस या ठिकाणी दोन दिवसांपूर्वी एक खोली बुक केली होती. बुधवारी रात्री ड्रग्ज विक्रेते हे ड्रग्जची डिलीव्हरी घेऊन गेस्ट हाऊसच्या खोलीवर येताच दबा धरून बसलेल्या गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी एमडी या ड्रग्जसह दोन जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १०.०८ कोटींचा एमडी हा ड्रग्ज जप्त करण्यात आला.

सेनुल जुलुम शेख (२८), जगनकीर शाह आलम शेख (२९) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. हे दोघे गोवंडी शिवाजी नगर परिसरात राहणारे आहेत. मागील काही महिन्यापासून हे दोघे अमली पदार्थ पोचवण्याचे काम करीत होते. अमली पदार्थ विक्रीचे हे मोठे (पान ४ वर)

बहुजन हिताय। बहुजन सुखाय।।

**सुविचार :** निद्रा ही मृत्यूची साथीदार; पण जीवनाची मैत्रीण.
**-आर. साऊथवेल**


# नवसंदेश

दैनिक 'नवसंदेश' हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक संजय प्रभाकर भोसले यांनी शहाजी प्रिंटिंग प्रेस, १५२२, सी, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर-४१६००२ (महाराष्ट्र) येथे छापून प्रसिध्द केले. फोन नं. २६४२८८०

e mail - dailynavsandesh@gmail.com


## भ्रष्टाचार ही सामाजिक समस्या

ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल ही संस्था दरवर्षी १८० देशांचा भ्रष्टाचारविषयक आलेख निर्देशित करणारा अहवाल प्रसिद्ध करते. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या या संस्थेच्या अहवालानुसार २०२४ मध्ये भारतातील भ्रष्टाचार वाढला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. २०२३ मध्ये भारत १८० देशांत ९३ व्या स्थानावर होता. तो घसरून २०२४ मध्ये भारत ९६ व्या स्थानावर गेला आहे. निर्देशांक निश्चित करण्याची ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलचे तज्ज्ञ प्रत्येक देशातील सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे मूल्यांकन करतात. भ्रष्टाचाराच्या व्याप्तीनुसार गुण दिले जातात. अहवालानुसार चीन ७६ व्या स्थानावर आहे. त्याच्या क्रमवारीत गेल्या दोन वर्षांत कोणताही बदल झाला नाही. पाकिस्तानातही भ्रष्टाचार वाढला असून, तो १३३ व्या स्थानावरून १३५ व्या स्थानावर पोहोचला आहे. या क्रमवारीत श्रीलंका १२१ व्या, तर बांगलादेश १४९ व्या स्थानावर आहे. जितके स्थान कमी तितका भ्रष्टाचार कमी असे हा अहवाल निर्देशित करतो. प्रथम क्रमांकावर असलेल्या डेन्मार्कमध्ये सर्वांत कमी भ्रष्टाचार आढळतो. फिनलंड आणि सिंगापूर हे द्वितीय आणि तृतीय क्रमांकावरील देश आहेत. भ्रष्टाचार मुक्त देशाचे स्वप्न पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना दाखवले. पण मोदींच्या दहा-बारा वर्षांच्या कार्यकाळातही भ्रष्टाचार कमी झालेला नाही. त्या आधी सत्तेवर असलेल्या 'यूपीए'च्या कार्यकाळाशी तुलना केली, तर भ्रष्टाचाराच्या स्थितीत कोणतीही लक्षणीय सुधारणा झाल्याचे दिसत नाही. सार्वजनिक क्षेत्रात, सरकारी कार्यालयात होत असलेल्या भ्रष्टाचाराचा अनुभव पदोपदी येत असतो. कोणतीही कामे संबंधित सरकारी अधिकाऱ्याला चिरीमिरी दिल्याशिवाय मार्गी लागत नाहीत. हा सर्वसामान्यांना येणारा नित्याचा अनुभव आहे. राजकीय नेत्यांकडून त्याकडे होणारा काणाडोळा आणि दुर्लक्ष हेच भ्रष्टाचार वाढण्यामागील कारण आहे. भ्रष्टाचार ही गंभीर सामाजिक समस्या आहे, तिचे मूळ प्रामुख्याने व्यक्तीच्या अनैतिक व्यवहारात आहे. नैतिक मूल्यांची होत असलेली घसरण किंवा ऱ्हास हे भ्रष्टाचाराच्या प्रवृत्तीचे मुख्य कारण आहे. खोटेपणा, नियमबाह्य वर्तन आणि अपारदर्शकता या बाबी बर्याचदा अनैतिक वर्तनाला कारणीभूत ठरतात. सभोवतालची सामाजिक, राजकीय परिस्थितीही भ्रष्टाचार वाढण्यास साहाय्यभूत ठरत असते. व्यक्तिगत लाभासाठी स्वतःला मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करणे हा देखील एक प्रकारचा भ्रष्टाचारच ठरतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सरकारी कर्मचाऱ्यांकडून राज्यातील महसुलातून होणारा पैशांचा अपहार आणि तेथे होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या प्रकाराच्या नोंदी आढळतात. याचा अर्थ अनादी काळापासून भ्रष्टाचार सुरू आहे. अलीकडच्या काळात तर भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला आहे.ऑनलाइन पद्धत आली आहे तरीही भ्रष्टाचार हा वाढतच चालला आहे.

सध्या ऑफलाइन पेक्षा ऑनलाईन पद्धतीवर जास्त भर दिला जात आहे. तरीही छुप्या पद्धतीने भ्रष्टाचार हा कुठेतरी चालूच आहे. अगदी छोट्याशा रकमेसाठी अधिकारी वर्ग हा भ्रष्टाचाराच्या जाळ्यात सापडत चाललेला आहे. भरमसाठ पगार शासकीय अधिकाऱ्यांना असतानाही हे अधिकारी भ्रष्टाचार करत आहेत. त्यामुळे त्या संबंधित विभागाची तर बदनामी होतच आहे शिवाय त्या अधिकारी वर्गाची आणि भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीची ही बदनामी होऊ लागलेली आहे.मात्र तरीही कोणी घाबरत नाहीत असेच.म्हणावे लागेल. ऑनलाइन पद्धतीने कामकाज सध्या सुरू झाल्याने यातील थोडासा का होईना या भ्रष्टाचाराला जरी आळा बसला असला तरी अजूनही भ्रष्टाचाराचे जाळे हे सुरूच असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे. अगदी छोट्या छोट्या कारणासाठी भरमसाठ रकमा या मागितल्या जात आहेत. त्यामुळेच हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी ठोस पावले उचलणे अत्यंत आवश्यक आहे.अगदी राजकीय व्यक्ती पासून ते खालच्या व्यक्तींपर्यंत भ्रष्टाचार होऊ लागलेला आहे राजकारणातही या भ्रष्टाचाराने मोठ्या प्रमाणात आपले जाळे विणलेले चित्र आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील राजकारण ही त्याच पद्धतीने सध्या खेळले जात आहे. असेही म्हटले जात आहे.भ्रष्टाचाराचे जाळे खालून वर पर्यंत पसरलेले आहे त्यामुळे हा भ्रष्टाचार संपवायचा असेल तर मुळापासून यावर घाव घालने आवश्यक आहे.

# केंद्र सरकार आणणार डिजिटल विधेयक

नवी दिल्ली : सोशल मीडियावरील अश्लीलता रोखण्यासाठी विद्यमान माहिती-तंत्रज्ञान (आयटी) कायद्याच्या जागी डिजिटल इंडिया विधेयक लागू करण्याच्या हालचाली सुरू आहेत. नव्या कायद्यात यूट्यूबर, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियाला नियमन करण्याच्या तरतुदींचा समावेश असेल.

डिजिटल इंडिया विधेयकावर केंद्र सरकारचे सुमारे १५ महिन्यांपासून काम सुरू आहे. परंतु विविध क्षेत्रासाठी विशिष्ट तरतुदी असलेला कायदा तयार करण्यात यावा, असा विचार पुढे आला. उदा. दूरसंचार, माहिती-तंत्रज्ञान आणि माहिती प्रसारणासाठी स्वतंत्र तरतुदी असाव्यात. यात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) कारभाराचीही व्यवस्था असावी, असे मत बनले.

ताजा घटनाक्रम पाहता केंद्र सरकार डिजिटल इंडिया बिल मांडण्याचाच विचार करीत आहे, असे सूत्रांनी सांगितले. तथापि, सोशल मीडिया व डिजिटल प्लॅटफॉर्मशिवाय कृत्रिम बुद्धिमत्तेचे काम व कारभार यातून वेगळा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी स्वतंत्र नियमन व नियमावली आवश्यक आहे.

आयटी कायद्यातील त्रुटी दूर करण्याकरिता काय उपाययोजना केल्या, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली होती. त्यावर समाधानकारक स्पष्टीकरण देण्याचे बंधन सरकारवर आहे. याशिवाय आयटी प्रकरणांवरील संसदीय समितीनेही अश्लील कंटेंटप्रकरणी सरकारकडे उत्तर मागितले आहे. या दोघांनाही नव्या डिजिटल नियमांची ब्लू प्रिंट सरकार सादर करणार आहे.

'आयटी कायदा २०००' लागू झाला त्या वेळी देशात ६० युजर होते. आता ही संख्या ९० कोटींवर गेली आहे. अश्लील व वाह्यात कंटेंटप्रकरणी आयटी कायद्यात काय तरतुदी आहेत, अशी विचारणा संसदीय समितीने सरकारला केली होती. सर्वोच्च न्यायालयानेही ॲटर्नी जनरल व सॉलिसीटर जनरलला पुढील सुनावणीला हजर राहण्यास सांगितले आहे.

### योगी सरकार 'आर्टिफिशियल इंटेलिजेंस सिटी'करणार स्थापन

लखनऊ : उत्तर प्रदेशच्या योगी सरकारने २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी ८ लाख, ८ हजार ७३६ कोटी ६ लाख रुपयांचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला. अर्थमंत्री सुरेश खन्ना यांनी राज्याच्या आर्थिक विकास आणि सामाजिक कल्याणाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल म्हणून अर्थसंकल्प मांडला. ते म्हणाले की, हे बजेट २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पापेक्षा ९.८ टक्के जास्त आहे, ज्यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला गती मिळेल. अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान, अर्थमंत्री सुरेश खन्ना यांनी आर्टिफिशियल इंटेलिजेंस सिटीच्या स्थापनेची घोषणाही केली.

शिक्षण अधिक बळकट करण्यासाठी, योगी सरकारने शिक्षण क्षेत्रासाठी १३ टक्के बजेटची तरतूद केली आहे. प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये आयसीटी लॅब आणि स्मार्ट क्लास सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. सरकारी पॉलिटेक्निक महाविद्यालयांमध्ये डिजिटल लायब्ररी आणि स्मार्ट क्लासेस सुरू करण्याच्या योजनांचाही समावेश आहे. याशिवाय, राज्यात संशोधन आणि विकासाला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

# प्रकाश आंबेडकरांचा सरकारवर आरोप

## कुंभमेळ्यात एक हजारांवर लोक चेंगराचेंगरीत मेले

सांगली : पंतप्रधान अमेरिकेला जाऊन आल्यापासून शेअर मार्केट पूर्णपणे कोसळत गेलं. धर्माच्या राजकारणाने देशाला आता धोक्याच्या घटकेपर्यत पोहोचवलं आहे. आज विरोधी पक्ष लकवा मारलेल्या परिस्थितीत असून त्यातून त्यांनी स्वतःला सावरत दुरुस्त करावे आणि हिटलरशाहीच्या सरकारचा विरोध करावा, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली.

आंबेडकर यांनी आज सांगलीत आयोजित पत्रकार परिषदेत केंद्र सरकारसह महाराष्ट्रातील सरकार आणि विरोधी पक्षावर जोरदार टीका केली. उत्तर प्रदेशमध्ये सुरू असलेल्या कुंभमेळावरूनही आंबेडकर यांनी मृत्यूच्या आकड्यावरून गंभीर आरोप सरकारवर केला.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, कुंभमेळा हा लोकांचा भावनिक, वैयक्तिक प्रश्न आहे. या कुंभमेळाव्याची उत्तर प्रदेश सरकारने सोय केली, पण ज्या पद्धतीने कुंभमेळ्याचे मार्केटिग चाललं आहे त्याचा निषेध आहे.

कुंभमेळाव्यात १ हजारांवर चेंगराचेंगरीत मृत्यूमुखी पडले हे दुर्दैवी आहे. शासनाने फक्त ३८ लोक मयत झाले म्हणून जाहीर केले. हिंदू संघटनांना आवाहन आहे, या लोकांचे अंत्यविधी कसे केले हे जाहीर करावं, असे त्यांनी सांगितले. या सगळ्या घटना पाहता धर्माचे राजकारण हे देशाला आता धोक्याच्या घटकेपर्यत पोहोचलं असल्याचे ते म्हणाले. आज विरोधी पक्ष लकवा मारलेल्या परिस्थितीत गेला आहे. त्यातून त्यांनी स्वतःला सावरत दुरुस्त करावे आणि हिटलरशाहीच्या सरकारचा विरोध करावा असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.

त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतःला विश्वगुरु समजतात, पण पंतप्रधान अमेरिकेला जाऊन आल्यापासून ते आजपर्यंत शेअर मार्केट पूर्णपणे कोसळत आहे. दुसरीकडे अमेरिकन डॉलर महाग होत चालला आहे. शासनाकडे येणारा जीएसटीचा ओघ कमी होत चालला आहे. अर्थव्यवस्थेवरचं हे मोठं संकट आहे. विरोधी पक्षांने दुर्दैवाने या घसरत चाललेल्या आर्थिक परिस्थितीवर मौन पाळलेले दिसते. अमेरिका आणि अदानीचे काय होईल ते होईल, पण याचा बागलबुलवा म्हणून वापर केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज या दोन्ही राजांनी इतिहास निर्माण केला तो प्रेरणादायी आहे. त्यामध्ये अडकून राहण्यापेक्षा त्यातून प्रेरणा घेत आपण नवा इतिहास निर्माण केला पाहिजे ही मनस्थिती मराठा समाजाने केली पाहिजे असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

# लाडकी बहिण योजना ही तर सरकारी पैशाने दिलेली लाच : राजू शेट्टी

अलिबाग : लाडकी बहिण योजना ही सरकारच्या पैशातून मतदारांना दिलेली लाच असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांनी केला आहे. लाडक्या बहिण योजनेमुळे किती योजनांना कात्री लावावी लागली हे सरकारने स्पष्ट करावे, या योजनेमुळे सामाजिक योजनांना लाडकी बहिण योजनेचा फटका बसला असल्याची टिप्पणी त्यांनी केली.

अलिबाग येथे पत्रकारांशी ते बोलत होते. राजू शेट्टी म्हणाले, गेल्या तीन वर्षापासून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे पैसे मिळालेले नाही. शेतकऱ्यांचे ठिबक सिंचनाचे अनुदान प्राप्त झाले नाही. सामाजिक योजनांना कात्री लावाची आणि सवंग प्रसिध्दी मिळेल अशा योजनांच्या पाठी धावायचे अशात हे सरकार फसले असल्याचा आरोप त्यांनी केला. लाडकी बहिण योजनेसाठी ४६ हजार कोटींचा खर्च केला जात आहे. त्यामुळे आदिवासी, दलित, अल्पसंख्यांक योजनांना या योजनेचा फटका बसला असला असल्याचा आरोपही त्यांनी केला.

संवेदनशील विषयांना हात घालून तरूणांची डोकी भडकवण्याचे काम सध्या सुरू आहे. यातून काही पक्ष स्वतःची राजकीय पोळी भाजून घेत आहेत. या तरुणांचे चळवळींच्या माध्यमातून प्रबोधन करणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. बीडच्या मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरही शेट्टी यांनी यावेळी भाष्य केले.

शरद जोशी म्हणायचे नेता तस्कर आणि गुंड अफसर हे सामान्य माणसाचे शत्रु आहेत. आता तशीच परिस्थिती आहे. राजकारण्यांनी गुंडाना संरक्षण द्यायचे, त्यांच्या भानगडींवर पांघरूण घालायचे, यातून अमाप पैसा गोळा करायचा आणि या पैश्यातून पुन्हा सत्ता मिळवायची. यात सामान्य माणूस पिचला जातो. या विरोधात रस्त्यावर उतरले पाहिजे, असेही ते म्हणाले.

## साहित्य संमेलनासाठी अतिरिक्त २ कोटी मंजूर

मुंबई : अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे सुरू होत असून, या संमेलनासाठी राज्य सरकारने २ कोटी रूपयांचा अतिरिक्त निधी मंजूर केला आहे. राज्य मराठी विकास संस्थेच्या माध्यमातून हा निधी देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. यासंदर्भातील शासकीय आदेश जारी करण्यात आला आहे.

मंजूर केलेला हा निधी फक्त मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास आणि संवर्धनासाठीच वापरला जाणार आहे. संमेलन संपल्यानंतर ३ महिन्यांच्या आत अखिल भारतीय साहित्य महामंडळाने राज्य मराठी विकास संस्थेकडे या निधीच्या वापराबाबतचे विनियोजन प्रमाणपत्र, संमेलन अहवाल आणि सनदी लेखापालांकडून तपासलेले विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

# मुंडेंच्या कारभाराने महाराष्ट्राला कलंक

## आजी-माजी कृषीमंत्र्यांच्या बरखास्तीची हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी

मुंबई : भारतीय जनता पक्षाचे देवेंद्र फडणीवस यांच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार भ्रष्ट मंत्र्यांची टोळी बनले आहे. शेतकऱ्यांच्या नावावर माजी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी भ्रष्टाचार करताना सर्व मर्यादा सोडल्याचे उघड झाले आहे.

आता माणिकराव कोकाटे यांना बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी नाशिक सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. या दोघांना मंत्रीमंडळातून बरखास्त करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, धनंजय मुंडे यांनी कृषी मंत्री असताना केलेल्या घोटाळ्याचा दररोज पर्दाफाश होत आहे. मुंडे यांच्या भ्रष्ट कारभाराने महाराष्टाच्या नावाला कलंक लागला आहे. आता माणिकराव कोकाटे यांना बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी २ वर्षांची शिक्षा आणि ५० हजारांच्या दंडाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्या प्रकरणी माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने ही शिक्षा ठोठावली आहे. यातून काही बोध घेऊन तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकाटेंना बरखास्त करायला हवे. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने केली जात आहे परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्याची धमक नाही.

भारतीय जनता पक्ष युतीचे सरकार भ्रष्टाचार करुन जनतेच्या पैशाची लुट करत आहे. एकीकडे राज्यातील शेतकरी शेतमालाला भाव मिळत नाही म्हणून आत्महत्या करत असताना राज्यातील मंत्री मात्र कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करत आहेत, हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राला शोभणारे नाही. मुंडे व कोकोटे हे दोन्ही मंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत पण उपमुख्यमंत्री अजित पवार या भ्रष्ट मंत्र्यांना पाठीशी घालत असल्याचे दिसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता तरी हिम्मत दाखवून भ्रष्ट मंत्र्यांना बाहेरचा रस्ता दाखववा. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना एका बोगस प्रकरणात दोन वर्षाची शिक्षा झाली होती तेव्हा वायुवेगाने चोवीस तासांच्या आत त्यांची खासदारकी रद्द केली व घर काढून घेतले होते त्याच वेगाने कोकाटे यांच्यावर कारवाई कधी होणार असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## पोलीस चकमकीत चार जहाल महिला नक्षलवादी ठार

बालाघाट : हॉकफोर्स, पोलिस आणि नलक्षवादी यांच्यात चकमक झाली, त्यावेळी चार जहाल महिला नक्षलवादी ठार झाल्या. या महिला नक्षलवाद्यांवर ६२ लाख रुपयांचे बक्षीस होते. चकमकीत ठार झालेल्या चारही महिला नक्षलवाद्यांची ओळख पटली असल्याची माहिती बालाघाट झोनचे पोलिस महासंचालक संजय सिंह यांनी बालाघाट येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

आशा कान्हा भोरमदेव (एरिया कमेटी कमांडर), शीला, रंजीता, लख्खे कान्हा भोरमदेव अशी चकमकीत ठार झालेल्या महिला नक्षलवाद्यांची नावे आहेत. या सर्वांवर विविध नक्षली कारवाई प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. या चारही महिला नक्षलवादी छत्तीसगड राज्यातील सुकमा जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे पुढे आले आहे. या चकमकीची माहिती देताना पोलिस महासंचालक संजय सिंह यांनी सांगितले गढी सूपखार वन परिक्षेत्रातील रौंदा फॉरेस्ट कॅम्पजवळ १९ फेब्रुवारी रोजी ही चकमक झाली. या चकमकीत काही नक्षलवादी ठार झाले. तर काही नक्षलवादी पळून गेले. या जंगलात हॉकफोर्स, पोलिस विभागाचे १२ पथकातील जवळपास ५०० जवानांचा समावेश होता. यात चार महिला नक्षलवादी ठार झाल्या तर काही नक्षलवादी जखमी झाले असून ते घनदाट जंगलाचा आधार घेत पळून जाण्यात यशस्वी झाले.

## फेस आयडीमुळे कर्मचारीवर्ग त्रस्त; २५ दिवसांनतरही खेळखंडोबा सुरूच

मुंबई : फेस आयडीनेच मंत्रालयात प्रवेश या पध्दतीने रोजच कार्यालयात पोचायला उशिर होत असल्याने कर्मचारी वर्ग त्रस्त झाला असून जोपर्यंत फेस आयडीची प्रक्रिया पूर्ण होत नाही तोपर्यंत जुन्या पध्दतीने प्रवेश ठेवावा असा मागणीवजा संतप्त सूर ते त्यांच्या खात्यांच्या अधिकाऱ्यांकडे काढत आहेत.

मंत्रालयीन कर्मचाऱ्यांचे फेस आयडी प्रवेश करण्याची प्रक्रिया जवळपांस २५ दिवसांनतरही खेळखंडोबा सुरूच असल्याने कर्मचारी व प्रवेश देण्यासाठी मंत्रालयाच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी असणारे पोलीस यांच्यात वादंग जुंपत आहे. त्यात आणखीन कार्यालयात पोहचायला वेळ लागत आहे. पण पोलीस ऐकत नसल्याने लवकर येऊनही लेटमार्क नोंदवला जाण्याची टांगती तलवार कर्मचाऱ्यांवर आहे.

प्रवेशाबाबतचा त्रास गृहविभागामार्फत दिल्या गेलेल्या ओळखपत्र व शासनमान्य पत्रकारांनाही होत आहे. प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अमूक एका गेटनेच प्रवेश दिला जाईल, असे बंधन घालण्यात आल्याने त्यांनाही प्रेसरुम, मंत्री व उच्चाधिकाऱ्यांकडे जायला उशिर होतो. यासंदर्भात प्रवेशासाठी संपर्क साधला असतात सेक्युअरटेक नावाच्या कंपनीला कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले आहे.

ते जे सॉफ्टवेअर वापरतात त्यामुळे त्यांना नेट मिळताना तांत्रिक दोष निर्माण होतात. तर काही प्रवेशाबाबत ज्यांचे नंबरची प्रक्रिया होऊन त्यांचेकडे फोटो व ईतर माहितीसाठी जातात तेव्हा ती माहिती त्यांच्याकडील लॅपटॉपमध्ये संकलीत व्हायला वेळ लागतो. यात नंबर वा स्पेलिंगमधली बारीकशी चूक फेस आयडीकरिता त्रासाची ठरते.

दरम्यान, कंपनीने हे काम घेताना सात दिवसांत म्हणजे ३१ जानेवारीपर्यंत काम पूर्ण करण्याची ग्वाही दिली होती. त्यामुळे त्यांना हे काम मंत्रालयाच्या आयटी डिपार्टमेंटने सोपवले होते. परंतु अद्यापपर्यंत त्यांचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार जोपर्यंत संबंधित खात्याकडून प्रक्रिया पूर्ण होत नाही. तोपर्यंत आमचा व खात्याचा नंबर जुळणार नाही. त्यामुळे कंपनीला कंत्राट देणाऱ्या उच्चाधिकाऱ्यालाही कर्मचारी व प्रवेश करु इच्छिणारे लाखोल्या वाहात आहेत.

# शिवाजी महाराजांबद्दल मला प्रचंड आदर - असदुद्दीन ओवैसी

नवी दिल्ली : छत्रपती संभाजी महाराज यांच्यावरील 'छावा' हा चित्रपट सध्या चांगलाच चर्चेत आहे. याच निमित्ताने ओवैसी यांनी थेट मराठ्यांचा इतिहास शिकवायला घेतला आहे. एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेत भारतीय जनता पक्षावर हल्ला केला आहे. शिवाजी महाराज यांचे नाव घेत भाजप चुकीची माहिती पसरवत असल्याचा आरोप त्यांनी केला. महाराज कधीही मुसलमानांचा द्वेष करत नव्हते, असेही ते म्हणाले असून पक्षाच्या अधिकृत ट्विटर हँडलवरून त्यांचा हा व्हिडिओ शेअर केला आहे. यात ते शिवाजी महाराजांबद्दल बोलत आहेत.

ओवैसी म्हणाले, मी शिवाजी महाराजांचा खूप आदर करतो. माझ्या मराठा बांधवांना मी सांगू इच्छितो की, मी त्यांचा फार आदर करतो, आणि कायम करत राहीन. छत्रपती शिवराय हे कधीच मुसलमानांच्या विरोधात नव्हते. हा भाजपचा खोटा अजेंडा असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

छत्रपती शिवरायांनी जेव्हा कल्याण जिंकले तेव्हा कल्याणच्या नवाबाची सून त्यांच्यासमोर आणली होती. तेव्हा शिवाजी महाराजांनी ही आपल्या सुनेसारखी असल्याचे सांगत योग्य सन्मानासह तिला परत पाठवले होते.

एका सभेत हे सांगताना ओवैसी यांनी भाजपाला अनेक प्रश्न विचारले. भाजपा आणि संघवाल्यांनी माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, असे आव्हानही त्यांनी दिले. आग्राच्या किल्ल्यातून जेव्हा महाराजांनी सुटका करून घेतली होती, तेव्हा त्यांच्यासोबत मदारी मेहतर हा होता, आणि तो मुसलमान होता, असे ओवैसी म्हणाले. तसेच त्यांच्या सैन्यातील प्रमुख लष्करी अधिकारी कोण होता, असे विचारतानाच इब्राहिम खान असे त्याचे नाव असल्याचे ओवैसी यांनी सांगितले.

शिवाजी महाराजांच्या कायदा अधिकाऱ्याचे नाव काय होते, असा प्रश्न देखील ओवैसी यांनी विचारला. त्यांचे नाव काझी हैदर असे होते. जेव्हा काजी हैदर मुसलमान असल्याबाबत त्यांना सांगण्यात आले तेव्हा ते म्हणाले होते की, माणसाची योग्यता त्याच्या धर्मावरून नाही तर त्याच्या कामावरून ठरते. पण, भाजपवाले कायम वेगळीच टेप वाजवत असतात.

अर्जदार करीता वकील ॲड. सविता बी. परब
(मो.नं. ८९९९२०६५२७)

## जाहिरनामा

**मे. ४ थे सह दिवाणी न्यायाधिशसोा, कनिष्ठ स्तर, कोल्हापूर**
**(श्रीमती एस.जे. शिंदेसो) यांचे कोर्टात**

**किर. दिवाणी अर्ज नं. ७०/२०२५**
**नि.नं.६/ड**

**१) शिला शांतीनाथ बेळवंकी** व.व. ६२, धंदा- घरकाम, रा. यश अपार्टमेंट, सुबराव गवळी तालिम समोर, मंगळवार पेठ, कोल्हापूर
**२) सौ. शोभा रमेश सदलगे** व.व. ६७, धंदा- घरकाम, रा. फ्लॅट नं. बी १७, संदुर गार्डन कोथरूड पूणे
**३) सौ. दिपा सुकुमार गुमताज** व.व. ६१, धंदा- घरकाम, रा. मु. पो. प्लॅट नं ८१, शिवाजी नगर शिरोली पुलाची ता. हातकणंगले जि. कोल्हापूर
**४) सौ. सुषमा अर्जुन दुकाने** व.व. ५९, धंदा- घरकाम रा. मु. पो. ५६६१/१ हरी इच्छा बाईसर ठाणे मुंबई
**५) सौ. स्मिता संजय लाड** व.व. ५६, धंदा- घरकाम रा. ३/१५, ज्ञानगंगा सोसायटी, जाधव नगर सिंहगड रोड कोथरूड पूणे
— अर्जदार

**विरूध्द**
**कोणीही नाही** — वि.प.

**भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारसा दाखला मिळणे करीता अर्ज.**

ज्याअर्थी अर्जदार नं १ ते ५ यांचे वडिल शांतीनाथ तवनाप्पा बेळवंकी हे दि. २४/११/२०२० इ रोजी कोल्हापूर मुक्कामी मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार यांच्या आई सुलोचना शांतीनाथ बेळवंकी या देखील दि. २६/०५/१९९८ इ रोजी मयत झालेल्या आहेत त्यांचे मृत्यू पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर व सरळ वारस असून अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत शांतीनाथ तवनाप्पा बेळवंकी हे सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये (उपअभियंता, सा.बां, उपविभाग कोल्हापूर) येथे रोड मेस्त्री या पदी कार्यरत होते. ते दि. ३१/०३/१९७९ इ रोजी नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले होते.

त्याचा महालेखापाल मुंबई यांचेकडील सेवानिवृत्त वेतन आदेश क्र पीपीओ नंबर एम ३८६५४ ८६४ असा होता. अर्जदार यांनी मयत शांतीनाथ तवनाप्पा बेळवंकी यांचे मृत्यूपश्चात महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि. क्र सेनिवे-२०१९/ प्र.क्र ५८/ सेवा ४ दि २४/०१/२०१९ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार कुंटुब निवृत्ती वेतन धारकाच्या मृत्यूच्या दिनांकापर्यतची हयात कालीन थकबाकी म्हणजेच शांतीनाथ तवनाप्पा बेळवंकी यांचे दि. ०१/०१/२०१६ ते ३१/१२/२०१८ या कालावधीतील निवृत्त वेतनाची थकबाकी मिळणे बाबत जिल्हा कोषागार कार्यालय कोल्हापूर यांचेकडे अर्ज केला असता त्यांनी अर्जदार नं १ यांना दि. १०/०३/२०२१ इ रोजी चे पत्राने वारसा दाखला आणणेबाबत सांगितलेचे कारणाने अर्जदार यांना वारसा दाखला मिळणेसाठी प्रस्तूतचा अर्ज अर्जदारांनी दाखल केलेला आहे

त्याअर्थी या जाहीरनाम्याद्वारे तमाम लोकांना कळविणेत येते की, मयत शांतीनाथ तवनाप्पा बेळवंकी यांना अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस असलेस अगर कोणाची काही हरकत असलेस त्यांनी स्वतः या न्यायालयात **दि २६/०३/२०२५** इ रोजी अगर त्यापूर्वी ठिक सकाळी १०.३० वाजता न चुकता ४ थे सह दिवाणी न्यायाधिशसो व स्तर कोल्हापूर यांचे न्यायालयात हजर राहावे तसेच याद्वारे असेही जाहिर करण्यात येते की, सदर दिवशी कोणा कडूनही हरकत आली नाही तर अर्जदार यांचे अर्जाबाबत पुढील पुरावा घेवून त्यांच्या मागणीप्रमाणे नोंद करणे बाबतचा आदेश पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी. अन्यथा अर्जदार यानी दाखल केलेल्या पुराव्या आधारे त्यांना वारसा दाखला देणेबाबत पुढील योग्य ते आदेश केले जातील.

येणेप्रमाणे आज दि. १५/०२/२०२५ इ.रोजी मे कोर्टाचे हुकुमावरून माझे सही निशी व न्यायालयाचे शिक्यनिशी जाहीरनामा प्रसिध्द केला असे.

**सही/–** **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **हुकुमावरून सही/– सहाय्यक अधिक्षक**
**४ थे स.दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कोल्हापूर**

**CHANGE IN NAME**
MY OLD NAME IS **SHABINA PATHAN** TO THIS MY NEW NAME IS **SHABINA IKRAMKHAN PATHAN**




अर्जदार तर्फे वकील ॲड. सतिश वाय. कुंभार

## जाहिरनामा

**मे. दिवाणी न्यायाधिशसो कनिष्ठ स्तर, पेठवडगाव**
**(मे.श्रीमती.एस.जे.पेंडेसो कोर्ट) यांचे कोर्टात**

**किर. दि. अर्ज नं. ०७/२०२५**
**नि.नं.६/डी**

**१. दक्षा वसंतभाई पटेल** व. व. ६३, धंदा- गृहिणी
**२. दिपक वसंतभाई पटेल** व.व. ३१, धंदा- व्यवसाय रा.४८११, वूड गार्ड जवळ, शिरोली पुलाची, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर
**३. निकिता भावेश पटेल** व.व. ३५, धंदा - गृहिणी रा.५३०/४, शनिवार पेठ, मार्केट यार्ड, कराड, ता. कराड जि.सातारा ४१५११०
— अर्जदार

**विरूध्द**
**कोणीही नाही** — वि.प.

**बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ कलम ८(२) प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी अर्ज**

ज्याअर्थी अर्जदार नं १ यांचे पती व अर्जदार नं २ व ३ यांचे वडील कै. वसंतभाई करमसी पटेल यांचे दि. १८/१२/२०२४ रोजी शिरोली पुलाची ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथे निधन झाले आहे. त्यांचे नावे मौजे शिरोली पुलाची ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथील प्लॉट नं ४०/१ वरील महेश टिंबर डेपो या आरागिरणीचा परवाना क्र. के-०४६/२०२५ (आय.डी.क्र.एम.एच.२३५६ केपीकेपी) यांचे नावे आहे. कै. वसंतभाई करमसी पटेल यांना अर्जदार क्र.१ या पत्नी, अर्जदार क्र २ हा मुलगा, व अर्जदार क्र ३ ही मुलगी या नात्याने सरळ व कायदेशीर वारस आहेत. कै. वसंतभाई करमसी पटेल यांचे नावे असणारा आरागिरणीचा परवाना क्र.के-०४६/२०२५ हा दि.३१/१२/२०२४ रोजी नुतनीकरण झालेला आहे. मृत्यूपूर्वी कै. वसंतभाई करमसी पटेल यांनी सदर परवाना अर्जदार क्र १ यांचे नावे नामनिर्देशित केला आहे. वर नमूद मयत यांना अन्य कोणीही कायदेशीर व सरळ वारस नाहीत. वर नमूद आरागिरणीचा परवाना क्र. के-०४६/२०२५ हा अर्जदार क्र १ यांचे हस्तांतरित होणे करिता अर्जदार यांनी मा.उपवनसंरक्षक, कोल्हापूर वनविभाग, कोल्हापूर यांना दि. ०४/०२/२०२५ रोजी विनंती केली असता अर्जदार यांना वारसा प्रमाणपत्र मे. कोर्टाकडून आणणेस तोंडी सांगितले. म्हणून अर्जदार नं. १ ते ३ यांना मे कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. त्यावेळी व वेळोवेळी अर्जास कारण घडलेले आहे व घडत आहे.

त्याअर्थी या जाहिर नाम्याद्वारे जाहीर करणेत येते कि, अर्जदार क्र १ ते ३ हे कै. वसंतभाई करमसी पटेल यांचे सरळ व कायदेशीर वारस असलेबाबत अन्य कोणाची हरकत असलेस त्यांनी व त्यांचे वकिलांनी या न्यायालयात **दि.२५/०३/२०२५** रोजी सकाळी ११.०० वाजता हजर राहून लेखी म्हणणे सादर करणेचे आहे. तसे न झालेस अर्जदार यांनी हजर केलेला पुरावा ग्राह्य धरून, पुढील आदेश पारित केला जाईल, म्हणून दिला जाहीरनामा.

आज दि. १४/०२/२०२५ इ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/–** **व. लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **हुकुमावरून सही/– सहाय्यक अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय क. स्तर,पेठवडगांव**

## काळेपडळ येथे ६६ लाखाचा गुटखा जप्त

पुणे : शहरातील उंड्री भागात अवैधरीत्या छुप्या पद्धतीने गुटख्याचा साठा करून त्याची विक्री सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. काळेपडळ पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने तब्बल ६६ लाखांचा गुटखा तसेच चार पिकअप पोलिसांनी जप्त केले असून एका आरोपीला अटक केली आहे. पुढील तपास केला जात आहे.

# भीमा कृषी पशू प्रदर्शनचा आज शुभारंभ

### २१ ते २४ फेब्रुवारी पर्यंत चार दिवस चालणार प्रदर्शन

कोल्हापूर/प्रतिनिधी : खासदार धनंजय महाडिक यांच्या संकल्पनेतून १६ वर्षापूर्वी सुरू करण्यात आलेले पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे भव्य असे भीमा कृषी व पशु पक्षी प्रदर्शन येत्या २१ ते २४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त असलेली माहिती मिळणारे व त्यांना शेतीसाठी आवश्यक असणारे साहित्य एकाच छताखाली खरेदी करता याव्यात यासाठी यावर्षी ही हे भव्य कृषी प्रदर्शन मेरी वेदर मैदानावर भरविण्यात येत असल्याची माहिती खासदार धनंजय महाडिक यांनी पत्रकार परिषदेत दिली.२०२५ मध्ये भरविण्यात आपल्या या प्रदर्शनाचे खास आकर्षण प्रदर्शनाचे खास आकर्षण जगातील सर्वात उंच हरियाणातील विधायक नावाचा सात वेळा नॅशनल चॅम्पियन मिळालेला मुऱ्हा जातीचा रेडा आहे.

देश-विदेशातील विविध नामांकित कंपन्यांचा सहभाग प्रदर्शनात असून विविध जातिवंत जनावरे, पशुपक्षी, तांदूळ महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. अशीही माहिती खासदार धनंजय महाडिक यांनी दिली.

या प्रदर्शनाचे उदघाटन २१ फेब्रुवारीस दुपारी ४.३० वाजता महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री ना.हसनसो मुश्रीफ,कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी माजी आमदार महादेवराव महाडिक यांची अध्यक्षस्थानी उपस्थिती असणार आहे.याचबरोबर आमदार अमल महाडिक,खासदार धैर्यशील माने आणि सर्व आमदार मान्यवर उपस्थित असणार आहेत.

तर २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या सांगता समारंभ व बक्षीस वितरण समारंभास राज्याचे आरोग्य मंत्री कोल्हापूरचे पालकमंत्री ना.प्रकाश आबिटकर,सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.चंद्रकांतदादा पाटील आणि सर्व आमदार उपस्थित असणार आहेत.

# सुरेश धस यांचे धनंजय मुंडेंना आवाहन

## दमानियांआधी माझ्यावर खटला दाखल करा

बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचा निकवर्तीय वाल्मीक कराड याच्यावर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. वाल्मीक कराडवर कारवाई करण्यात आल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होताना दिसत आहे.

तर दुसरीकडे सामाजिक कार्यकर्ता अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे हे कृषीमंत्री असताना त्यांनी कृषी खात्यात मोठा घोटाळा केल्याचा आरोप वारंवार करताना दिसत आहेत. अशातच भाजपा आमदार सुरेश धस यांनी आज पत्रकार परिषद घेत धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप करत अंजली दमानिया यांच्यावर अब्रु नुकसानीचा दावा करण्याआधी माझ्यावर खटला दाखल करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना सुरेश धस म्हणाले की, कृषी विभागातील कृषी सहाय्यकाच्या बदलीसाठी ६० हजार रूपये घेण्यात येत होते. त्यातील २० हजार कृषीमंत्री आणि बाकी अधिकाऱ्यांना दिले जात होते. या संबंधित घोटाळ्याची तपासून कारवाई करावी यासाठी भारतीय किसान संघाने देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले होते. मात्र वाल्मीक कराडने ते पत्र फाडून टाकले होते. त्यामुळे कृषी विभागाला मी आव्हान करतो की, तुमच्याकडे ते पत्र असेल तर दाखवावे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात उत्तर द्यावे. याशिवाय वाल्मीक कराडने भारतीय किसान सभेचे पत्र फाडून टाकल्यामुळे त्याची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी सुरेश धस यांनी केली.

सुरेश धस म्हणाले की, सीबीआय, ईडी आणि एसीबीकडे याबाबतची सविस्तर तक्रार मी करणार आहे. धनंजय मुंडे यांनी केलेल्या बदल्यांमध्ये १०० कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे. बदल्यांसाठीचे रेट कार्ड त्यांच्या



हाताखाली काम करणाऱ्यांकडे सापडले आहे. धनंजय मुंडे यांच्याकडे सर्व वाटा जात होता आणि वाल्मीक कराडने निविदा ठरवल्या होत्या. पण वाल्मीक कराड हा राज्याचा बाप होता का? असा प्रश्न उपस्थित करत धस म्हणाले की, महाराष्ट्रात ठराविक एजंटची नेमणूक केली होती. या सर्वांचे सीडीआर काढा. १०० कोटींपेक्षा अधिकचा भ्रष्टाचार यात आहे, असा दावा त्यांनी केला.

सुरेश धस म्हणाले की, आकाचे कार्य फक्त बीड जिल्हा पुरते नव्हते, तर संपूर्ण महाराष्ट्रभर होते. आता कागदाचा लढा चालू द्या. माझ्यावर खटला दाखल झाला तरी आता माघार घेणार नाही. कारण हा सगळा एकूण ३०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. धनंजय मुंडे म्हणतात अंजली दमानिया यांच्यावर अब्रु नुकसानीचा दावा करणार आहेत. मी त्यांना आवाहन करतो की, त्यांनी माझ्यावर आधी खटला दाखल करावा, असे सुरेश धस म्हणाले.

# कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना दिलासा; न्यायालयाकडून जामीन मंजूर

मुंबई : कृषी मंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने १९९५ सालच्या एका प्रकरणात नाशिकच्या जिल्हा न्यायालयानं दोन वर्षांनी शिक्षा सुनावली होती.

कागदपत्रं फेरफार आणि फसवणुकीचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. दरम्यान, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना कोर्टाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. १५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर हा जामीन



देण्यात आला आहे. माणिकराव कोकाटे यांना जामीन मंजुर झाला असला, तरी त्यांना पुढील ३० दिवसांत सत्र न्यायालयात अपील करावे लागणार आहे.

१९९५ मध्ये कागदपत्रांची फेरफार आणि फसवणुकीच्या आरोपांवरून हा निर्णय देण्यात आला आहे. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी १९९५ मध्ये माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात सदनिकांच्या घोटाळ्यांसंदर्भात याचिका दाखल केली होती. आमच्याकडे घर नाही आणि आमचे उत्पन्न कमी असल्याचे सांगून माणिकराव कोकाटे आणि भाऊ सुनील कोकाटे यांनी मुख्यमंत्री निधीतील सदनिका घेतल्याचा आरोप करण्यात आला होता.

याबाबतचा गुन्हा नाशिकच्या सरकार वाडा पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आलेला होता. हे प्रकरण १९९७ पासून सुरु होतं आणि आज या प्रकरणाचा निकाल लागलेला आहे. यामध्ये एकूण चार आरोपींना दाखवण्यात आलेले होते. त्यामध्ये माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या बंधूसह इतर दोघांचा समावेश होता. मात्र इतर दोन जणांबाबत कोर्टाने कुठल्याही स्वरूपाच्या शिक्षेची तरतूद केलेली नाही. मात्र माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू या दोघांना दोन वर्षाची शिक्षा आणि ५० हजारांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

## धनंजय मुंडे बेल्स पाल्सी आजाराने त्रस्त

मुंबई : राज्याचे कॅबिनेटमंत्री धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी हा आजार झाला असून त्यांना २ मिनिटेही नीट बोलता येत नाही, असे त्यांनी स्वतःच सोशल मीडियावर पोस्ट करुन सांगितले.

माझ्या दोन्ही डोळ्यांवर पंधरा दिवसांपूर्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. पद्मश्री डॉ.टी.पी. लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया पार पडल्या आहेत. साधारण दहा दिवस त्यांनी डोळ्यांची काळजी विशेषतः तीव्र प्रकाश, धूळ आणि उन्हा पासून काळजी घेण्याचा सल्ला दिला होता. त्याच दरम्यान मला बेल्स पाल्सी नावाच्या आजाराचे निदान झाले. त्याच्यावरील उपचाराचे निदान सध्या रिलायन्स हॉस्पिटल मधील प्रसिद्ध डॉ. अरुण शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या



आजारामुळे सध्या मला सलग दोन मिनिटही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे, सध्या एक-दोन कॅबिनेट बैठका आणि पक्षाच्या जनता दरबार कार्यक्रमाला मला उपस्थित राहता आले नाही, अशी माहिती मंत्री मुंडे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टममधून दिली. तसेच, याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच आमच्या पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कल्पना दिलेली आहे. लवकरच या आजारावर मात करून मी पुन्हा जनसेवेच्या कामात रुजु होईल.

## हुपरी नगरपरिषद हुपरी
### जाहीर सूचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता सदर अधिनियमांचे कलम ३ (१) व शासनाद्वारे वेळोवेळी निर्गत आदेश शासन निर्णय व परिपत्रके याद्वारे नागरिकांना पुरवण्यात येत असलेल्या क वर्ग नगरपरिषदेस लागू होणाऱ्या एकूण ६५ लोकसेवा हुपरी नगरपरिषदेद्वारे अधिसूचित करणेत आलेल्या आहेत. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित करणेत आलेली आहे. तसेच अधिसूचित लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, नियम कालमर्यादा, शुल्क, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशील https://huparimc.co.in/huparimc/index.php या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेला असून नगरपरिषदेच्या दर्शनी भागातील सूचनाफलकावर देखील पहावयास मिळेल.
दिनांक- २१/०२/२०२५

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**हुपरी नगरपरिषद हुपरी**

अर्जदार तर्फे वकील ॲड. डी. एम. पाटील

## जाहिरनामा

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, पन्हाळा, जि. कोल्हापूर**
**(श्रीमती व्ही. आर. मानेसो) यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ०६/२०२५**
**नि.नं.८/डी**

**१. श्री. शिवाजी रामचंद्र शेटे**, व.व. ५२, धंदा- नोकरी, रा. पोहाळे रोड, कुशिरे, पोर्ले तर्फे आळते, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर — अर्जदार

**विरूध्द**
**कोणीही नाही** — वि.प.

**बॉम्बे रेग्यु. ॲक्ट १८२७ चे Sec. VIII प्रमाणे वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज**

या जाहिरनाम्याद्वारे सर्वांना कळविणेत येते की,

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे दि. ०४/०२/२०२५ इ. रोजी अर्ज दाखल करुन यातील अर्जदार हे वर नमुद पत्त्यावरील रहिवाशी असुन ते कामानिमित्त त्यागावी राहतात. यातील अर्जदार यांचे चुलते कै. बापू शंकर शेटे हे दि. ११/०३/२००० इ. रोजी कोलोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार यांचे वडील कै. रामचंद्र शंकर शेटे हे दि. ०६/०६/२००७ इ. रोजी मयत झाले असून अर्जदार यांची आई कै. व्दारकाबाई रामचंद्र शेटे या दि. ०४/०९/२०१६ इ. रोजी मयत झालेल्या आहेत. कै. बापू शंकर शेटे यांचे लग्न न झालेने ते अविवाहित मयत झालेमुळे त्यांना मुलगा अगर मुलगी असे कोणतेही अपत्य नव्हते व नाही. त्यांना अर्जदार हेच एकमेव सरळ व कायदेशीर वारस आहेत. मयत कै. बापू शंकर शेटे यांचे मृत्युपश्चात त्यांचे मालकीचे मौजे कोलोली, ता. पन्हाळा, येथील गट नं. ८९३ या मिळकतीचे ७/१२ पत्रकी व असेसमेंट तसेच प्रॉपर्टी कार्ड सदरी वारस म्हणून अर्जदार यांचे नाव लावणेकरिता तसेच अर्जदार यांनी गा. का. तलाठीसोा, कोलोली यांना विचारणा केली असता त्यांनी अर्जदार यांना मे. कोर्टामार्फत वारसा दाखला आणणेबाबत कळवले असल्याने यातील अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहिरनाम्याद्वारे कळविणेत येते की मयत कै. बापू शंकर शेटे यांना वर नमुद केले अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणी वारस असलेस अथवा नमुद अर्जदार वारस असलेबाबत हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी अगर त्यांचे तर्फे वकिल यांनी **दिनांक १६/०४/२०२५** इ. रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात हजर होवून आपले लेखी म्हणणे मांडावे तसे जर झाले नाही. तर अर्जदार यांनी दाखल केलेला पुरावा गृहीत धरुन अर्जदार यांना वारसा दाखला दिला जाईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

आज दिनांक - २०/०२/२०२५ इ. रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

**सही/–** **क. लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **हुकुमावरून सही/– सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, पन्हाळा**

